# कॅनरा बँकेतर्फे पाळी कोठंबी ग्रामपंचायतीत नागरिकांसाठी 'जन सुरक्षा अभियान' शिबिर

न्यूज डेस्क । गोवन वार्ता



जन सुरक्षा अभियान कार्यक्रमात उपस्थित ग्रामस्थ आणि मान्यवर.

**पणजी :** कॅनरा बँकेने ३१ जुलै रोजी पाळी कोठंबी ग्रामपंचायतीत आर्थिक समावेशनाचे जन सुरक्षा अभियान शिबिर आयोजित केले. या मोहिमेचा उद्देश भारत सरकारच्या प्रमुख कार्यक्रम पीएमजेजेबीवाय, पीएमएसबीवाय आणि एपीवाय अंतर्गत ग्रामस्थांना शिक्षित करणे आणि त्यांची नोंदणी करणे आहे. या शिबिराला आरबीआयचे प्रादेशिक संचालक प्रभाकर झा, आरबीआ-यच्या उपमहाव्यवस्थापक सँड्रा रॉड्रिग्ज, आरबीआयच्या अतिरिक्त महाव्यवस्थापक दीपिका नेगी, कॅनरा बँकेचे अधिकारी, सरपंच आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

आरबीआयचे प्रादेशिक संचालक प्रभाकर झा यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला आणि त्यांना बँक खाते उघडून योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. त्यांनी सायबर सुरक्षा, आरई केवायसी नॉर्म्सचे पालन करण्याचे महत्त्व आणि तक्रार निवारण यंत्रणेवरही भर दिला. या उपक्रमाला ग्रामस्थांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. विविध योजनांअं-तर्गत नोंदणीसाठी मोठ्या संख्येने अर्ज आले.

१९०६ मध्ये स्थापन झालेली कॅनरा बँक ही भारतातील सर्वांत मोठ्या सार्वजनिक क्षेत्रातील बँकांपैकी एक आहे. या बँकेच्या देशभरात शाखा आणि एटीएमचे विस्तृत जाळे आहे. आर्थिक वाढ आणि सामाजिक कल्याणासाठी राष्ट्रीय उपक्रमांना सक्रियपणे पाठिंबा देताना बँक नाविन्यपूर्ण आणि समावेशक आर्थिक उपाय प्रदान करण्यास वचनबद्ध आहे.